# सिडको-हडकोतील श्रीराम मंदिरांत रामजन्मोत्सव उत्साहात; ठिकठिकाणी महाप्रसाद

**रामकथा, कीर्तन, शोभायात्रांनी वातावरण भक्तिमय; नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग**





**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

रामनवमीच्या निमित्ताने सिडको व हडको येथील श्रीराम मंदिरांत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊन रामजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. परिसरातील मंदिरांमध्ये रामकथा, कीर्तन, महायज्ञ, शोभायात्रा व महाप्रसाद यांसारख्या कार्यक्रमांमुळे भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. सिडको येथील राममंदिरात दि. 19 ते 25 मार्च दरम्यान प्रवचनकार प्रणव जनार्दन पटवारी यांची श्रीरामकथा पार पडली. त्यानंतर 23 मार्च रोजी रुद्र स्वाहाकार महायज्ञ, तर 26 मार्च रोजी रामजन्म कीर्तन, पाळणा व महाआरती आयोजित करण्यात आली. सायंकाळी श्रीरामाची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. 27 मार्च रोजी 'रामधुन' या भक्तीसंगीत कार्यक्रमासह महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. हडको येथील राममंदिरातही 26 मार्च रोजी 'रामधुन' कार्यक्रम, रामजन्म, आरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधी व मान्यवर उपस्थित होते. तसेच सिडको येथील गुरुवार बाजार परिसरात ठाकूर परिवाराच्या वतीने ह.भ.प. सौ. पुरीबाई यांच्या भजन-कीर्तनासह महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमालाही मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थिती लावली. या सर्व कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी मंदिर समिती, युवक मंडळे व महिला मंडळांनी परिश्रम घेतले. शहरातील विविध भागांतही रामनवमी मोठ्या भक्तिभावात साजरी करण्यात आली.

# पेट्रोल पंपांवर लांबच लांब रांगा; नागरिकांमध्ये संभ्रम

■ अफवा आणि साठेबाजीमुळे

**सर्वतीर्थ टाकेद : (समर्थ गांवकरी)**




इगतपुरी तालुक्याच्या पूर्व भागात पेट्रोल पंपांवर सध्या मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असून, पहाटेपासूनच वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र दिसत आहे. विशेष म्हणजे काही ठिकाणी रुग्णवाहिका देखील या रांगांमध्ये अडकून पडल्याचे पाहायला मिळाले, ज्यामुळे गंभीर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पेट्रोल आणि डिझेल टंचाई होण्याच्या भीतीने लोक पहाटेपासूनच पंपावर रांगा लावत आहेत. दरम्यान, काही ठिकाणी साठेबाजी करून इंधन काळ्या बाजारात विक्रीसाठी ठेवले जात असल्याच्या चर्चांनाही उधाण आले आहे. प्रशासनाने याबाबत लक्ष देण्याची गरज व्यक्त केली जात आहे. आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधन पुरवठ्यावर परिणाम होण्याची भीती नागरिकांमध्ये पसरली आहे. याचदरम्यान, सोशल मीडियावर फिरणाऱ्या फेक मेसेज, यूट्यब व्हिडिओ आणि व्हॉट्सॲप फॉरवर्डमुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. राज्य सरकारकडून इंधन पुरवठा सुरळीत असल्याचे वारंवार स्पष्ट करण्यात येत असले तरी, नुकत्याच कोरोनाच्या संकटातून बाहेर पडलेल्या नागरिकांमध्ये अजूनही असुरक्षिततेची भावना कायम आहे. त्यामुळे संभाव्य टंचाईच्या भीतीने नागरिक अधिक सतर्क झाले असून, त्याचा परिणाम पेट्रोल पंपांवरील वाढत्या गर्दीतून दिसून येत आहे. प्रशासनाने अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले असून, नागरिकांनी संयम राखून परिस्थितीचा सामना करावा, असेही सांगण्यात आले आहे.

# श्रीराम जन्मोत्सवानिमित्त ढोल लेझिम स्पर्धेचे आयोजन

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



■ छत्रपती संभाजी महाराजांचा जीवंत देखावा

निघोज येथे श्रीराम जन्मोत्सवा निमित्त रविवार दि . २९ रोजी सायंकाळी ५ वाजता भव्य पारंपारीक ढोल , लेझिम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती निघोज येथील सकल हिंदू समाज व श्रीराम जन्मोत्सव समितीने दिली आहे .

निघोज येथील सकल हिंदू समाज , श्रीराम जन्मोत्सव समिती च्या संयुक्त विद्यमाने रविवार दि . २९ रोजी सायंकाळी ५ ते ७ वाजेपर्यंत प्रभू श्रीरामांची अत्यंत उत्साह पूर्ण वातावरणात वाद्यांच्या गजरात , फटाक्यांच्या आतिषबाजीत , घोषणांच्या दणदणाट भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून यावेळी निघोज मध्ये प्रथमच निघोजकरांच्या डोळ्यात पाणी आणि अक्षरशःअंगावर काटा आणणारा छत्रपती संभाजी महाराज यांचा जिवंत देखावा अभिनेते अर्जुन अंबेकर आणि त्यांचा समूह उभा करणार आहेत .

तदनंतर भव्य पारंपारीक ढोल लेझिम स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून प्रथम क्रमांकाचे २१ हजार १ रुपये , व्दितीय क्रमांकाचे १५ हजार १ रुपये , तृतीय क्रमांकाचे ११ हजार १ रुपये , चतुर्थ क्रमांकाचे ७ हजार १ रुपये , पंचम क्रमांकाचे ५ हजार १ रुपयांचे बक्षिस ठेवण्यात आले आहे . ज्या मंडळांना या ढोल , लेझिम स्पर्धेत सहभागी व्हायचे आहे , त्यांनी याच दिवशी सायंकाळी ५ वाजेपर्यंत नाव नोंदणी करणे बंधनकारक असून डावामध्ये कमीत कमी ११ खेळाडू असणे आवश्यक आहे . सदर स्पर्धेमध्ये पिढीजात व पारंपारीक डाव बक्षिस पात्र राहतील प्रत्येक मंडळास खेळ सादर करण्यास २० मिनिटांचा वेळ राहील , एकाच नंबरमध्ये २ संघाची निवड झाल्यास बक्षिस विभागुण दिले जाईल , या खेळामध्ये कोणत्याही प्राण्याचा समावेश करता येणार नाही , पंच राष्ट्रपती पुरस्कार विजेते बाळासाहेब घोडे गुरुजी यांचा निर्णय अंतिम राहील . संपर्कासाठी भीमराव लामखडे , दुरध्वनी ९९७०९९५१५१ , गणेश वराळ , दुरध्वनी ९९६०००१९३० वर संपर्क साधावा , असे आवाहन करण्यात आले आहे .

# जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यात दि २८ मार्चच्या सकाळी ६ वाजेपासून ते ११ एप्रिल च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 37 (1) व (3) अन्वये जिल्ह्यात 28 मार्चच्या सकाळी 6 वाजेपासून ते 11 एप्रिल 2026 रोजी मध्यरात्रीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

# लोहगडावर रविवारी गडकोट संवर्धन मोहीम

**खा. नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखालील उपक्रम**

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**






सह्याद्रीतील छत्रपती शिवाजी महाराजांचा ऐतिहासिक वारसा जतन करण्यासाठी खासदार नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखालील आपला मावळा या सामाजिक संघटनेमार्फत दर महिन्याला आयोजित करण्यात येणारी गटकोट संवर्धन व स्वच्छता मोहिम या महिन्यात किल्ले लोहगड येथे रविवार दि.२९ मार्च रोजी आयोजित करण्यात आली आहे. गेल्या वर्षी १० मार्च रोजी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून खा. लंके यांनी या मोहिमेची घोषणा केली होती. त्यानंतर प्रत्येक महिन्याला एका रविवारी ही मोहीम विविध गडांवर आयोजित करण्यात आलेली आहे. या मोहीमेत युवक व नागरिकांनी मोठया संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील किल्ले लोहगड हा मराठा इतिहासातील महत्वाचा गड असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात त्याला विशेष रणनीतिक महत्व होते. गडावरील तटबंदी, दरवाजे आणि विंचूकाटा सारखी वैशिष्ट्ये आजही इतिहासाची साक्ष देतात. मात्र वाढत्या पर्यटकांच्या गर्दीमुळे निर्माण होणारा कचरा आणि पर्यावरणीय ताण लक्षात घेता, या गडाच्या संवर्धनची गरज अधोरेखित होते. या पार्श्वभूमीवर रविवार दि.२९ मार्च रोजी सकाळी ७ वाजता लोहगडावर ही विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. मोहिमेदरम्यान गडावरील स्वच्छता, प्लॉस्टिक कचरा निर्मूलन, पायवाटांची निगा, तसेच ऐतिहासिक वास्तूंचे जतन यावर भर दिला जाणार आहे. स्वयंसेवकांना गटांमध्ये विभागून नियोजनबध्द पध्दतीने काम केले जाणार असून, पर्यावरण संरक्षणाबाबतही मार्गदर्शन दिले जाणार आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गड आपले, जबाबदारीही आपली या भावनेतून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी हातभार लावण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**खा. लंके मुक्कामी**

खा. लंके यांच्यासह मोहीमेत सहभागी होणारे मावळे हे शनिवारी सायंकाळीच गडाच्या पायथ्याशी मुक्कामी थांबणार आहेत. सकाळी सात वाजताच या मोहीमेस प्रारंभ करण्यात येणार असून सहभागी होणा-या इच्छुकांनी रविवारी सकाळी वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# भोळेवाडी साळवे वस्ती जवळ भरधाव पिकअपची दुचाकीला धडक

**युवक गंभीर जखमी!**

**कोतुळ : (समर्थ गांवकरी)**




कोतुळ येथून झेंडूच्या फुलांचा पिकअप भरून जात असताना भोळेवाडी साळवे वस्ती जवळ मुख्य रस्त्यावर भीषण अपघात झाला. भरधाव वेगाने येणाऱ्या पिकअपने समोरून येणाऱ्या हिरो होंडा स्प्लेंडर दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. मिळालेल्या माहितीनुसार, एमएच 17 बीपी 8363 क्रमांकाच्या हिरो होंडा स्प्लेंडरचा चालक निखिल बाळकृष्ण दिघे (वय 27, रा. सातेवाडी नागमाळ) हा आपल्या शेतातील माल दुचाकीवरून ओतूर येथे देऊन परत घरी येत होता. त्यावेळी समोरून येणारा एमएच 17 बीवाय 7504 क्रमांकाचा झेंडूच्या फुलांनी भरलेला पिकअप भरधाव वेगात येऊन त्याला धडक दिली.

या पिकअपचा चालक दिगंबर दौलत वायळ (वय 24, रा. केळी, ओतूर) असून त्याच्यासोबत क्लीनर योगेश दारकू भवारी (वय 19, रा. केळी, कोतुळ) होता. पिकअपचा मालक रोहिदास वाजे (रा. आबिटखिंड, ता. अकोले, जि. अहिल्यानगर) असल्याचे सांगण्यात आले. अपघाताचा मोठा आवाज झाल्याने शेजारील साळवे वस्तीतील राजेंद्र साळवे, अभिजीत देशमुख, बालू देशमुख, प्रकाश देशमुख व संतोष तळेकर यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तत्काळ १०८ रुग्णवाहिकेला संपर्क साधला. चालक नागेश भोर यांच्यासह डॉ. पोपट पारधी घटनास्थळी दाखल झाले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या निखिल दिघे यांना तात्काळ कोतुळ ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. डोक्याला गंभीर दुखापत व मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याने पुढील उपचारासाठी त्यांना प्रवरा रुग्णालयात हलविण्यात आले.

दरम्यान, भोळेवाडी व साळवे वस्तीतील नागरिकांनी या ठिकाणी वारंवार अपघात होत असल्याने येथे तात्काळ गतिरोधक बसविण्याची मागणी केली आहे.

# गजानन कोतलवार यांना सुवर्णपदक

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यात कार्यरत वनरक्षक गजानन व्यंकट कोतलवार यांना वनसंरक्षण व संवर्धनातील उत्कृष्ट कार्याबद्दल सन २०२४-२५ साठी वन विभागाचा सर्वोच्च 'सुवर्णपदक' पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. देगलूर वन परिक्षेत्रांतर्गत कार्यरत असताना त्यांनी केरूर, आदमपूर, अंजनी व मुतन्याळ ता. बिलोली येथे महाराष्ट्र शासनाच्या ५० कोटी वृक्ष लागवड योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर रोपलागवड करून रोपवने यशस्वी केली. वनसंवर्धन, वनसंरक्षण व नाविन्यपूर्ण कामगिरीची दखल घेत शासनाने त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली. दरवर्षी वन विभागाकडून उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना राज्यस्तरावर सुवर्ण व रजत पदक देऊन गौरविण्यात येते.



# महासंघाच्या महत्वपूर्ण विषयाची दिल्लीत दखल

**रावेर : (समर्थ गांवकरी)**

■ राष्ट्रीय अध्यक्ष माजी आमदार लोक नेते श्री. रमेश दादा पाटील यांच्या कार्याला यश

बीएसएनएल मधील महाराष्ट्रातील काही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे जातीच्या दाखल्यासंदर्भातील प्रकरणांमुळे सेवानिवृत्तीचे लाभ रोखण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर कोळी महासंघाने याची दखल घेतली आणि राष्ट्रीय अध्यक्ष मा. आमदार श्री. रमेशदादा पाटील आणि कोळी महासंघाचे नेते मा. श्री. सुभाष कोळी यांनी दिल्ली येथे केंद्रीय दूरसंचार मंत्री मा. ज्योतिरादित्य सिंधिया यांची भेट घेऊन या विषयावर सविस्तर चर्चा केली. केंद्रीय मंत्र्यांनी या प्रकरणाची दखल घेत योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. कोळी महासंघाने घेतलेल्या या महत्वपूर्ण विषयाला यश मिळणारच असा विश्वास महाराष्ट्रातील बीएसएनएल मधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी केंद्रीय मंत्र्यांना दिलेल्या सकारात्मक पत्राचीही नोंद घेण्यात आली असल्याने आनंद व्यक्त केला जात आहे.

# मंगरूळपीर पंचायत समितीत अस्वच्छतेचे साम्राज्य

**मंगरूळपीर : (समर्थ गांवकरी)**



नागरिकांच्या मूलभूत सुविधांची पूर्तता व्हायला हवी असलेल्या मंगरूळपीर पंचायत समिती कार्यालयातच धक्कादायक अस्वच्छता पाहायला मिळत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी ठेवण्यात आलेल्या फ्रिजची अवस्था अत्यंत बिकट असून त्याच्या आजूबाजूला घाण साचलेली आहे. त्यामुळे या फ्रिजमधील पाणी पिणे म्हणजे आजारांना निमंत्रण देण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. फ्रिज परिसरात सर्वत्र अस्वच्छता दिसून येत असून काही अधिकारी व येणारे-जाणारे नागरिक विमल गुटखा व तंबाखू सेवन करून त्याच ठिकाणी थुंकत असल्याचे चित्र दिसत आहे. परिणामी परिसरात दुर्गंधी पसरली असून स्वच्छतेचा पूर्ण अभाव जाणवत आहे. राज्यात गुटखा बंदी असताना पंचायत समिती कार्यालयाच्या आत गुटखा कसा पोहोचतो, तो सेवन कोण करत आहे आणि याकडे लक्ष देणार कोण, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. ज्या ठिकाणी स्वच्छतेचे उदाहरण असणे अपेक्षित आहे, त्याच ठिकाणी अस्वच्छतेचे साम्राज्य पसरल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या परिस्थितीमुळे कार्यालयातील कर्मचारी तसेच विविध कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. संबंधित प्रशासनाने तात्काळ लक्ष देऊन स्वच्छता राखावी, गुटखा-तंबाखू सेवनावर बंदीची कठोर अंमलबजावणी करावी व पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे.

# नॅशनल टेक्नीकल स्टुडंटस आसोशियन NTSA संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष पदी अनिल पाटील धमने यांची निवड

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**



अनिल पाटील धमने हे गेल्या २८ वर्षा पासून विविध पक्ष संघटनेत सामाजिक क्षेत्रात कार्य करीत असून त्यांना सर्व क्षेत्रातील दांडगा अनुभव असल्या मुळे त्याच्या आजवर केलेल्या उल्लेखनिय कार्याची दखल घेऊन NTSA संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हिटलर भोसले यांच्या आदेशानुसार त्यांच्या सही निशी प्रदेशाध्यक्ष भास्कर हंबर्डे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली आहे . अनिल पाटील धमने हे १९९८ पासून शिवसेना . भाजपा . राष्ट्रवादी कॉग्रेस . महात्मा फुले समता परिषद या सह ओबीसी संघर्ष समिती महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस व शिवसेना ओबीसी निवड समिती सदस्य म्हणून तर ते सध्या विद्यमान शिवसेना ओबीसी जिल्हाप्रमुख तर व्हॉईस ऑफ मिडीया पत्रकार संघ मुख्य सचिव या पदावर कार्यरत काम करीत असून त्यांना शासकीय . शैक्षणिक . सामाजिक . राजकीय .क्षेत्रातील कामाचा मोठा अनुभव पाहता त्यांनी आजवर केलेल्या कार्याची दखल घेऊन नॅशनल टेक्नीकल स्टुडंटस आसोशियन NTSA संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष हिटलर भोसले यांच्या आदेशाने महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष भास्कर हंबर्डे यांनी दि २७ मार्च रोजी एका छोटे खानी कार्यक्रमात हॉटेल आकृती जुना कौठा नांदेड येथे अनिल पाटील धमने यांची निवड करण्यात आली यावेळी मराठवाडा अध्यक्ष शंकर धिरडीकर मराठवाडा कायदेशिर सल्लागार ॲड चंद्रप्रकाश सांगवीकर . नांदेड दक्षिण जिल्हाध्यक्ष शिलानंद सोनकांबळे . नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष पदी राम पाटील मुदखेडे आंदीची नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली . शैक्षणिक अडचणी दुर करण्यासाठी काम करणे, तसेच हे पुर्णपणे सामाजीक, शैक्षणिक, सांस्कृतीक, औध्योगीक व क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन देणारे संघटन असून, सर्व समाजातील विद्यार्थ्यांचा कल हा उद्योजकते कडे वळला पाहिजे असा सामाजिक विचार करून संघटन निर्माण करणे व त्याची बांधनी ही एक राजकीय चळवळ नसुन विद्यार्थी संगोपन व विद्यार्थी विकासाच्या दृष्टीने काम करणारी संघटना आहे.

तसेच बेरोजगारांना रोजगार मिळवुण देणे व भटक्या विमुक्त जाती मागासवर्गीय, बहुजन समस्त बांधवांना शैक्षणिक न्याय मिळवून देण्यासाठी या संघटनेचे मुख्य उध्दीष्ट असतील असे नियुक्ती पत्रात नमुद केले आहे

या निवडी बद्दल सामाजिक राजकीय शासकीय आदी सह मित्र मंडळिंनी अनिल पाटील धमने यांच्यावर अभिनंदना चा वर्षाव केला जात आहे .

# फेब्रुवारी २०२६ मध्ये पुण्यात १५,५००+ मालमत्ता नोंदणी

## नाइट फ्रँक इंडिया : फेब्रुवारी २०२६ मध्ये पुण्यात १५,५७९ मालमत्ता नोंदणी झाली

### त्याच कालावधीत मुद्रांक शुल्कातून 708 कोटींचे संकलन झाले

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

नाइट फ्रँक इंडियाच्या ताज्या मूल्यमापनानुसार पुण्याच्या निवासी मालमत्ता बाजारात फेब्रुवारी 2026 मध्ये 15,579 नोंदणी झाल्या असून, त्यातून 708 कोटींचा मुद्रांक शुल्क महसूल प्राप्त झाला. वर्षानुवर्षांच्या (YoY) आधारावर, फेब्रुवारी 2025 मधील 19,025 युनिट्सच्या तुलनेत नोंदणीत 18% घट झाली; मात्र मुद्रांक शुल्क संकलन अधिक स्थिर राहिले आणि ते केवळ 1% नी कमी होऊन 713 कोटींवरून घसरले. हा फरक उच्च-मूल्याच्या मालमत्तांकडे होत असलेल्या सततच्या झुकावाचे प्रतिबिंब दर्शवतो. क्रमिक (MoM) आधारावर, दोन्ही निर्देशांकांमध्ये सुधारणा दिसून आली. जानेवारी 2026 मधील 14,537 च्या तुलनेत नोंदणी 7% ने वाढली, तर मुद्रांक शुल्क संकलन 609 कोटींवरून 16% ने वाढले. 1 कोटीपेक्षा कमी किमतीच्या घरांचा व्यवहारांमध्ये अजूनही सर्वाधिक वाटा आहे; मात्र मागणीची रचना मध्यम-मूल्य आणि प्रीमियम विभागांकडे वळली आहे. 50 लाख–1 कोटी विभागाचा वाटा फेब्रुवारी 2026 मध्ये 29% पर्यंत वाढला, जो वर्षभरापूर्वी 27% होता, तर 1–2.5 कोटी श्रेणी 12% वरून 15% पर्यंत वाढली. खालच्या स्तरावर, 25 लाखांखालील विभागात तीव्र घट झाली असून, तो वर्षानुवर्षे 7 टक्के गुणांनी घसरून 24% वर आला. एकूणच, हा बदल मूल्य श्रेणीतील सातत्याने वरच्या दिशेने होत असलेल्या हालचालीचे संकेत देतो, जिथे मध्यम आणि प्रीमियम गृहनिर्माण विभाग मागणीतील अधिक मोठा वाटा मिळवत आहेत, जरी एकूण व्यवहारांचे प्रमाण चढ-उतार होत असले तरी. शिशिर बैजल, इंटरनॅशनल पार्टनर, चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक, नाईट फ्रँक इंडिया, म्हणाले, "फेब्रुवारी 2026 मधील पुण्याचा निवासी बाजार हा समायोजनाच्या टप्प्याचे प्रतिबिंब आहे. गेल्या वर्षाच्या उच्च आधाराच्या तुलनेत नोंदणीत घट झाली असली तरी मुद्रांक शुल्क संकलन जवळपास अपरिवर्तित राहिले, ज्यातून उच्च-मूल्याच्या गृहनिर्माण व्यवहारांचा वाढता वाटा दिसून येतो. जानेवारीच्या तुलनेत नोंदणीत 7% वाढ आणि मुद्रांक शुल्क संकलनात 16% वाढ दर्शवते की मागणीचा वेग कायम आहे. खरेदीदार मोठ्या आणि उच्च-मूल्याच्या घरांना प्राधान्य देत आहेत, ज्यामुळे बाजार हळूहळू मोठ्या व्यवहारमूल्यांकडे आणि सुधारित उत्पादन गुणवत्तेकडे वाटचाल करत आहे, व्यापक मंदीऐवजी." फेब्रुवारी 2026 मधील घरांच्या आकाराबद्दलची पसंती अनेक तिमाहींपासून वाढत असलेल्या एका ट्रेंडला पुष्टी देते. खरेदीदार मोठ्या जागेसाठी खरेदी करत आहेत. 500 चौरस फुटांपेक्षा कमी आकाराच्या घरांचा विभाग वार्षिक 26% वरून 23% पर्यंत घसरला, आणि लहान स्टुडिओ-आकाराच्या घरांची मागणी कमी झाल्यामुळे अनेक तिमाहींपासून सुरू असलेली ही घसरण कायम आहे. 500-800 चौरस फुटांचा विभाग 46% सह बाजाराचा मुख्य आधारस्तंभ राहिला आहे, जो 45% वरून किंचित वाढला आहे. हे मध्यम-उत्पन्न गटातील अंतिम वापरकर्त्यांकडून असलेल्या सततच्या मागणीला दर्शवते. 800-1,000 चौरस फूट आणि 1,000-2,000 चौरस फूट या दोन्ही गटांमध्ये मोठ्या घरांनी प्रत्येकी एक टक्का वाढ नोंदवत 14% चा टप्पा गाठला, तर 2,000 चौरस फुटांपेक्षा मोठ्या घरांचा वाटा 3% वर स्थिर राहिला. हा कल अधिक प्रशस्त घरांसाठी असलेली सततची पसंती दर्शवतो, विशेषतः बाजारात आपले घर बदलणाऱ्या अंतिम वापरकर्त्यांमध्ये.

# बी.एड. महाविद्यालयाला चार लॅपटॉपची भेट!



**शेवगाव : (समर्थ गांवकरी)**

लग्नाच्या वाढदिवसाचे औचित्य साधत समाजाभिमुख उपक्रम राबवत पोलीस उपनिरीक्षक सतीश हनुमंतराव शिदोरे (खारघर वाहतूक शाखा, नवी मुंबई) यांनी आबासाहेब काकडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय (बी.एड.), शेवगाव, जि. अहिल्यानगर येथील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उपयोगासाठी चार लॅपटॉप भेट दिले. यासोबतच चार चार्जर व दोन कीबोर्डही महाविद्यालयाला सुपूर्द करण्यात आले. ही साहित्य भेट महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भगवान बारस्कर, प्राचार्य भालसिंग मॅडम, नाईक मॅडम, नेव्हल सर, बांगर सर, काळे सर तसेच क्लर्क गोरे सर व काकडे मॅडम यांच्या उपस्थितीत देण्यात आली. यावेळी महाविद्यालयाच्या वतीने पोलीस उपनिरीक्षक सतीश शिदोरे यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी तंत्रज्ञानाची मदत महत्त्वाची असून भविष्यातही शिक्षण क्षेत्रासाठी अशा प्रकारची मदत करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली.




# आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाडमध्ये वसुंधरा अकॅडमीच्या १५ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले येथील वसुंधरा अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाड (IMO) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. दिनांक १२ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित या परीक्षेत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गणितीय क्षमता, तर्कशक्ती आणि समस्या सोडवण्याचे कौशल्य प्रभावीपणे सादर केले. या स्पर्धेत एकूण ९७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यापैकी १५ विद्यार्थ्यांना उत्कृष्ट कामगिरीबद्दल सुवर्णपदक व सहभाग प्रमाणपत्राने सन्मानित केले ८२ विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मानांकन व कामगिरीबद्दल प्रमाणपत्र प्राप्त झाले. शाळेने सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे त्यांच्या कठोर परिश्रम व समर्पणाबद्दल अभिनंदन केले आहे.

विशेषतः पदक विजेते व मानांकन प्राप्त विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांचे हे यश त्यांच्या वैयक्तिक प्रयत्नांसोबतच शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचा पाठिंबा यांचे फलित असल्याचे विद्यालयाने नमूद केले. संस्थेचे अध्यक्ष मा. मधुकरराव नवले तथा भाऊ, संस्थेच्या कोषाध्यक्ष तथा प्राचार्य डॉ. जयश्री देशमुख, संस्थेचे सचिव विक्रम नवले, संस्थेचे सहसचिव प्रा. अल्फोन्सा डी. वसुंधरा उपप्राचार्य राधिका नवले, व्यवस्थापन मंडळातील सर्व सदस्य, सर्व शिक्षक यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या भावी शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# श्री कालिका देवी यात्रा उत्सव ३० मार्चपासून

**राहुरी : (समर्थ गांवकरी)**

सोमवंशीय क्षत्रिय कासार समाजाचे कुलदैवत असलेल्या श्री क्षेत्र निनगुर (ता. नेकनूर, जि. बीड) येथील श्री कालिका देवी (निनगुर माता) यांच्या सुवर्ण महोत्सवी वार्षिक यात्रा उत्सवाचे आयोजन चैत्र शुद्ध द्वादशी, सोमवार दि. ३० मार्च ते चैत्र शुद्ध पौर्णिमा, गुरुवार दि. २ एप्रिल २०२५ या कालावधीत करण्यात आले आहे. यामध्ये विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती देवस्थानचे अध्यक्ष शिवाजीराव काटकर व सचिव डॉ. सोनाजीराव पाटील यांनी दिली. यात्रा काळात दररोज सकाळी ६ वाजता सप्तशती पाठ, सकाळी ७ वाजता अभिषेक व आरती, सकाळी ९ वाजता अल्पोपहार, सायंकाळी ७ वाजता आरती व नैवेद्य तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

# शासकीय आदर्श आश्रमशाळांसाठी इ. ५वी साठी प्रवेश पूर्व परीक्षेचे आयोजन

- 31 मार्च पर्यंत परिपूर्ण भरलेले अर्ज राजूर व मवेशी आदर्श आश्रम शाळेत जमा करण्याचे आवाहन
- आदर्श आश्रमशाळांमध्ये प्रवेशासाठी 12 एप्रिल रोजी परीक्षेचे आयोजन - परीक्षाप्रमुख श्रीमती नागरगोजे

**अकोले (जि.अहिल्यानगर) : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास विभागांतर्गत नाशिक विभागाच्या विद्यानिकेतन धर्तीवर चालविल्या जाणाऱ्या शासकीय आदर्श आश्रमशाळांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी इयत्ता ५ वीमध्ये प्रवेश देण्यासाठी १२ एप्रिल २०२६ रोजी प्रवेशपूर्व स्पर्धा परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी व पाल्याच्या पालकांनी पूर्ण भरलेले अर्ज दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत एकात्मिक कार्यालय राजूर आणि आदर्श आश्रम शाळा भंडारदरा (कॅम्प मवेशी) येथे सादर करण्याचे आवाहन मा. अप्पर आयुक्त (एकात्मिक आदिवासी विकास विभाग नाशिक), मा. प्रकल्प अधिकारी राजूर, मा. कुलप्रमुख आदर्श आश्रम शाळा मवेशी यांनी केले आहे. नाशिक विभागांतर्गत शासकीय आदर्श आश्रमशाळा भंडारदरा (कॅम्प मवेशी), ता. अकोले व शासकीय आदर्श आश्रमशाळा देवमोगरा, ता. नवापूर, जि. नंदुरबार या शाळांमध्ये इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतचे वर्ग सुरू आहेत. या शाळांमध्ये प्रवेशासाठी दरवर्षी शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा तसेच जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता ४ थी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेश पूर्व परीक्षा घेऊन गुणवत्तेनुसार पुढील शैक्षणिक वर्षात ५ वीत प्रवेश दिला जातो.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश मिळविण्यासाठी चालू शैक्षणिक वर्ष (२०२५-२६) मध्ये चौथीत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ सकाळी ११ ते दुपारी १२.३० या वेळेत घेण्यात येणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी अगस्ती एज्युकेशन सोसायटीचे कन्या विद्यालय, अकोले हे परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आले आहे. शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा व जि.प. शाळांमध्ये इयत्ता ४ थी मध्ये शिक्षण घेत असलेले अनुसूचित जमाती व आदिम जमातीचे विद्यार्थी पात्र राहतील. या परीक्षेसाठी प्रवेशार्थी विद्यार्थी हा अनुसूचित जमातीचा असावा, प्रविशार्थी विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्याचा आधिवासी असावा, विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा अधिक नसावे, ही स्पर्धा परीक्षा पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या व धरतीवर असेल प्रतिवर्षी इयत्ता पाचवी मध्ये वीस मुले व वीस मुलींना सदर आदर्श आश्रम शाळांमध्ये प्रवेश दिला जातो. या परीक्षेसाठी भाषा, सामाजिक शास्त्र, गणित, बुद्धिमत्ता चाचणी व सामान्य ज्ञान असे विषय असून 100 गुणांसाठी 50 प्रश्न व एक तास तीस मिनिटे वेळ निश्चित केलेला आहे.

आदर्श आश्रम शाळा प्रवेश क्षमता व जोडलेले प्रकल्प हे नाशिक विभागांतर्गत शासकीय आदर्श आश्रमशाळा भंडारदरा (कॅम्प मवेशी), ता. अकोले अंतर्गत राजूर, नाशिक, कळवण यासाठी 20 मुले व 20 मुली अशी एकूण 40 विद्यार्थी व शासकीय आदर्श आश्रमशाळा देवमोगरा, ता. नवापूर, जि. नंदुरबार या आदर्श आश्रम शाळेअंतर्गत संलग्न तळोदा, नंदुरबार, यावल, धुळे यासाठी 20 मुले व 20 मुली अशी एकूण 40 विद्यार्थी पात्र राहतील.

# चिंचोली शाळेस सभापती- उपसभापतींची अचानक भेट






**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर पंचायत समितीच्या नवनिर्वाचित सभापती कमला ताई शेळकंदे,उपसभापती अमित ढोले तसेच जिल्हापरिषद सदस्य गुलाबशेठ पारखे यांनी चिंचोली (काशिद) येथील जिल्हा परिषद शाळेस अचानक भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला व त्यांना मार्गदर्शन केले. चिंचोली गावाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात सहभाग घेत तालुक्यात गुणां नुसार पहिल्या चार ग्रामपंचायतीं मध्ये स्थान मिळविले आहे. या पार्श्वभूमीवर मान्यवरांनी शाळे तील सुरू असलेल्या नवीन इमारत बांधकामाची पाहणी करून कामाची गुणवत्ता कायम राखण्याच्या सूचना दिल्या. तसेच शाळेला मिळालेल्या विविध स्पर्धांतील ट्रॉफींसाठी नव्या इमारतीत स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले.विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सभापती कमलाताई शेळकंदे यांनी विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास करण्यासोबत च प्रश्न विचारण्याची सवय जोपासण्याचे आवाहन केले. शाळा सातवीपर्यंत असल्याने लवकरच महिला शिक्षिकेची नेमणूक करण्याचेही त्यांनी आश्वासन दिले. जिल्हा परिषद सदस्य गुलाबशेठ पारखे यांनी शाळेच्या विकासासाठी आवश्यक ती सर्व मदत देण्याची ग्वाही दिली शाळे चे उपशिक्षक कैलास दाभाडे यांनी शाळेत राबविण्यात येणा ऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.मराठी,हिंदी,इंग्रजीसह फ्रेंच,स्पॅनिश,जर्मन,जपानी भाषा,संगणक कोडिंग,स्पर्धा परीक्षा तयारी,दप्तरमुक्त शनिवार आनंदी बाजार तसेच विविध क्रीडा उपक्रम राबविले जात असल्याचे त्यांनी सांगितले शाळेत डिजिटल बोर्ड,संगणक प्रयोगशाळा असून पुढील वर्षा पासून रोबोटिक्स लॅब सुरू होणार आहे.शाळेची गुणवत्ता टिकविण्यासाठी शिक्षकांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन उपसभापती अमित ढोले यांनी केले. या प्रसंगी सरपंच खंडू काशिद,उपसरपंच इम्रान चौगुले पोलिस मित्र नवनाथ ताजणे, अशोक गुंजाळ,उपशिक्षक विवेकानंद दिवेकर व ग्रामस्थ उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मारुती साबळे यांनी केले,तर आभार राजेश दिवेकर यांनी मानले.

# कार्यशाळेचे आयोजन

**राहुरी : (समर्थ गांवकरी)**

प्रहारच्यावतीने दिनांक 29 व 30 मार्च रोजी प्रहार करिअर अकॅडमी,पुणे-संभाजीनगर रोड लगत, इमामपूर,अहिल्यानगर येथे प्रहार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली व प्रहार कार्याध्यक्ष बल्लूभाऊ जवंजाळ, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष धर्मेंद्र सातव यांच्या उपस्थितीत पदाधिकारी/ कार्यकर्त्यांची व राज्यातील प्रहार संघटनेची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.. या कार्यशाळेमध्ये दोन दिवस स्वतः बच्चु भाऊ आपणास मार्गदर्शन व प्रशिक्षण देणार आहेत. आंदोलनाविषयी यावेळी सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्यात येणार आहेत. राज्यस्तरीय प्रशिक्षण व कार्यशाळेसाठी आपण कार्यकर्ते पदाधिकारी सह स्वतः उपस्थित राहावे.

# उत्तम सदाकाळ यांना "आनंदाचं झाड" पुरस्कार

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

परभणी जिल्ह्यातील सेलू तालुक्यात उपक्रमशीलतेने वेगळी ओळख निर्माण करणा ऱ्या "आनंदाचं झाड' म्हणून प्रसिद्ध असलेल्या जि.परिषद प्राथमिक शाळा पारडीच्या वतीने दिला जाणारा मानाचा व अत्यंत प्रतिष्ठेचा आनंदाचं झाड बालसाहित्य ग्रंथ कृतज्ञता पुरस्कार" प्रसिद्ध साहित्यिक उत्तम सदाकाळ यांना शाळेतील मुलांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.विशेष म्हणजे या पुरस्काराची निवड शाळेतील मुलांनीच केली. राज्यभरातून आलेल्या अनेक पुस्तकातून उत्तम सदाकाळ यांच्या 'बोळातले भूत' या पुस्तकाची निवड मुलांच्या निवड समितीने केली.पुरस्कार समारंभाचे संपूर्ण नियोजन मुलांनीच केले व कार्यक्रम यशस्वी केला.या प्रसंगी विद्यार्थी व उपक्रमशील शिक्षक युवराज माने यांनी पुढील भावना व्यक्त केल्या.माणसं भेटतात आणि शब्दांना जीव मिळतोमुळं लेखन वाचतात त्यांचं बालमन हसतं, विचार करतं उंच भरारी घ्यायला शिकतं. उत्तम सदाकाळ लेकरांच्या आनंदासाठी लिहिणारा, त्यांच्या कृतीला मनापासून सलाम करणारा एक जिवंत शब्दकार... त्यांच्या 'बोळातलं भूत' या सुंदर कथासंग्रहाला आमच्यालेकरांनी 'आनंदाचं झाड बालसाहित्य ग्रंथ कृतज्ञता पुरस्कार' देऊन सन्मानित केलं हा फक्त पुरस्कार नव्हता तर बालमनातूनउमटलेलं कृतज्ञतेचं खरं भावविश्व होतं... त्यांचं स्वागतही लेकरांनी अगदी मनापासून केलं फुलांपेक्षा सुंदर होती त्यांची निरागस स्मितं या नंतर रंगल्या भरपूर गप्पा,गोष्टी, हशा आणि विचारांची देवाण घेवाण शाळेतील कु.ईश्वरी राठोड हिने घेतलेली उत्तम सदाकाळ यांची मुलाखत तर खूपच खास ठरली लेकरांच्या प्रत्येक प्रश्नाला त्यांनी ज्या आत्मीयतेने उत्तर दिलं.

अशा भेटी म्हणजे फक्त कार्यक्रम नसतात त्या प्रेरणेच्या नव्या वाटा उघडणाऱ्या,बाल मनात स्वप्नांची बीजं पेरणाऱ्या असतात 'आनंदाचं झाड' असंच फुलत राहोआणि अशा सुंदर माणसांच्या सहवासाने अधिक समृद्ध होत राहो याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रल्हाद काणेकर:- संचालक, शारदा विद्यालय, सेलू होते. प्रमुख अतिथी म्हणून नितीन लोहाट:/ संचालक,जिजाऊ ज्ञान तीर्थ विद्यालय,परभणी,उदय जाधव (गटविकास अधिकारी), अनिल शंकर राठोड (अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती, पारडी), विठ्ठलराव राठोड (तंटामुक्ती अध्यक्ष), साहेबराव राठोड (माजी पोलीस पाटील), डी.डी.रोकडे (केंद्रप्रमुख, वालुर) अनिल राठोड (उपाध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती) व शिवाजी लंघे (माजी उपाध्यक्ष,शाळा व्यवस्थापन समिती) उपस्थित होते.तसेच शाळेचेमुख्याध्यापक डी. के. कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.प्रास्ताविक युवराज माने यांनी केले तर आभार प्रदर्शन गणेश आकलोड यांनी मानले.या सन्मानसोहळ्या मुळे साहित्यिक उत्तम सदाकाळ यांचे समाजाच्या सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

# थायलंडच्या फुकेतमध्ये मराठी संस्कृतीची छाप; रिअल इस्टेट गुंतवणुकीची नवी दिशा!

### फुकेतमधील 'दगडूशेट गणपती' मंदिर जगभरातील पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र!

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

हिंद महासागराच्या निळ्याशार किनाऱ्यांनी नटलेले, डोंगररांगा, समुद्रकिनारे आणि समृद्ध सांस्कृतिक वारसा लाभलेले थायलंडमधील फुकेत हे जगातील सर्वात आकर्षक पर्यटनस्थळांपैकी एक मानले जाते. प्राचीन काळापासून व्यापार, समुद्री संपर्क आणि विविध संस्कृतींच्या संगमामुळे फुकेतने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. बौद्ध परंपरा, मंदिरसंस्कृती, तसेच अतिथी देवो भव या तत्त्वावर आधारित आदरातिथ्यामुळे जगभरातील पर्यटक आणि व्यावसायिक येथे आकर्षित होतात.

अशा या निसर्गसंपन्न आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध फुकेतमध्ये पुण्यातील प्रसिद्ध श्रीमंत दगडूशेट हलवाई गणपती मंदिराची हुबेहूब प्रतिकृती उभारण्यात आली असून, मराठी संस्कृतीचा जागतिक स्तरावर विस्तार करण्याचा एक अनोखा उपक्रम साकार झाला आहे.

दुबईस्थित उद्योगपती आणि गल्फ महाराष्ट्र बिझनेस फोरमचे ग्लोबल अध्यक्ष डॉ. सुनील व्ही. मांजरेकर यांच्या पुढाकारातून भारतीय—विशेषतः महाराष्ट्रीयन नागरिकांसाठी फुकेतमध्ये घर खरेदीची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. त्यांच्या SQCC Properties LLC (Dubai, UAE) आणि Phuket9 Real Estate Development (Thailand) यांच्या संयुक्त विद्यमाने अत्याधुनिक सोयीसुविधांनी युक्त निवासी आणि व्यावसायिक प्रकल्प उभारले जात आहेत. फुकेतच्या रम्य समुद्रकिनाऱ्यालगत, शांत आणि निसर्गरम्य वातावरणात उभे राहणारे हे प्रकल्प आधुनिक जीवनशैली, सुरक्षितता आणि जागतिक दर्जाच्या सुविधा देणारे आहेत. त्यामुळे पर्यटन, व्यवसाय आणि स्थिर उत्पन्न या तिन्ही दृष्टीकोनातून गुंतवणूकदारांसाठी हा प्रकल्प विशेष ठरत आहे.


'Phuket9' ही कंपनी 2004 पासून फुकेतमध्ये रिअल इस्टेट क्षेत्रात कार्यरत असून, विकास, बांधकाम आणि व्यवस्थापन या सर्व क्षेत्रांत विश्वासार्ह नाव म्हणून ओळखली जाते. कंपनीच्या पोर्टफोलिओमध्ये हॉटेल्स, कॉन्डोमिनियम्स आणि लक्झरी व्हिला यांचा समावेश असून सर्व प्रकल्पांसाठी व्यावसायिक प्रॉपर्टी मॅनेजमेंट सुविधा दिल्या जातात.

मुंबईतील JW Marriott, सहार येथे आयोजित कार्यक्रमात Phuket9 च्या संस्थापक मिस पापाचसॉर्न मीपा (Ms. Papachsorn Meepa ("Kae") यांच्या उपस्थितीत या प्रकल्पाची घोषणा करण्यात आली. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष रवींद्र माणगावे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. फुकेतमधील दगडूशेट गणपती मंदिराच्या निर्मितीमागील कथा प्रेरणादायी आहे. या मंदिरात होणाऱ्या शोडोपचार पूजा, आरती आणि भजनात परदेशी नागरिकांचा



सहभाग पाहून भारतीय संस्कृतीचे जागतिक आकर्षण स्पष्ट होते. या मंदिराची निर्मिती सौ. मीपा यांच्या वडिलांनी केली असून, स्वतः त्यांचा मंदिरातील दररोजच्या सेवा कार्यात विशेष सहभाग असतो. या प्रसंगी बोलताना मिस पापाचसॉर्न मीपा (Ms. Papachsorn Meepa ("Kae") म्हणाल्या, "आमचे ध्येय म्हणजे आमच्या ग्राहक, भागीदार आणि आमच्या टीमसाठी एक मजबूत आणि स्थिर संस्था उभी करणे. या दृष्टीकोनामुळे अधिकाधिक सकारात्मक विचारांचे लोक आमच्याशी जोडले जात आहेत. आम्हाला आमच्या मुख्य कार्यालयात आपले वैयक्तिक स्वागत करण्यास नेहमीच आनंद वाटतो. फुकेत येथे आपले हार्दिक स्वागत आहे!" यावेळी डॉ. सुनील व्ही. मांजरेकर म्हणाले, "फुकेत ही केवळ पर्यटनस्थळ नाही, तर भारतीयांसाठी सुरक्षित आणि फायदेशीर गुंतवणुकीचे नवे केंद्र आहे. मराठी संस्कृतीची जोड आणि जागतिक दर्जाच्या सुविधांमुळे हा प्रकल्प गुंतवणूकदारांसाठी विशेष ठरेल." रिअल इस्टेटमध्ये गुंतवणूक ही भांडवल सुरक्षित ठेवण्यासाठी आणि त्यात सातत्याने वाढ करण्यासाठी सर्वात प्रभावी पर्याय मानली जाते. वाढता पर्यटन व्यवसाय, मर्यादित जमीन उपलब्धता आणि नियोजित विकासामुळे फुकेतमधील मालमत्ता बाजार सातत्याने बळकट होत आहे. Phuket9 चा फुल-सायकल ॲप्रोच हा या प्रकल्पाचा मुख्य आधार असून, सखोल मार्केट रिसर्चपासून ते टर्नकी डेव्हलपमेंट आणि व्यवस्थापनापर्यंत सर्व सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून दिल्या जातात. त्यामुळे गुंतवणूकदारांना स्थिर आणि विश्वासार्ह परतावा मिळण्यास मदत होते. कंपनीकडून मोफत कन्सल्टेशन सेवा उपलब्ध असून, ग्राहकांना योग्य मालमत्ता निवडण्यासाठी तसेच वैयक्तिक प्रोजेक्ट प्रेझेंटेशनद्वारे मार्गदर्शन केले जाते. फुकेतमधील रिअल इस्टेट गुंतवणुकीच्या अधिक माहितीसाठी आणि संधी जाणून घेण्यासाठी Ms. Shreya Manjjarekar, SOC Corporation Properties LLC, Tel : +971 50 472 9635, +97145136075 Mob: +971505343653, sunil@sqccproperties.com मेलवर किंवा www.sqccproperties.com या वेबसाइटला भेट द्यावी.

# ठाण्यातील कल्पतरू पार्कसिटीची १०:९० योजना गुंतवणूकदारांसाठी ठरतेय 'गेमचेंजर'



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

शहरातील रिअल इस्टेट बाजारात पुन्हा एकदा गुंतवणुकीची चैतन्यदायी लाट दिसू लागली असून, या वाढत्या आकर्षणामागे महत्त्वाचा घटक ठरतोय कल्पतरू पार्क सिटी या प्रकल्पाची 10:90 पेमेंट योजना. कमी गुंतवणुकीत मोठा फायदा मिळवून देणारी ही योजना गुंतवणूकदारांसाठी 'सुवर्णसंधी' मानली जात आहे. या योजनेनुसार खरेदीदारांना सुरुवातीला केवळ 10 टक्के रक्कम भरावी लागते, तर उर्वरित 90 टक्के रक्कम ताबा मिळाल्यानंतर द्यायची आहे. त्यामुळे ईएमआयचा ताण त्वरित येत नाही आणि गुंतवणूक अधिक सुलभ व नियोजनबद्ध होते.

कोलशेत रोडवरील सुमारे 100 एकरांवर उभारलेला हा भव्य टाउनशिप प्रकल्प ठाण्यातील सर्वात मोठ्या निवासी प्रकल्पांपैकी एक मानला जातो. 2, 3 आणि 4 बीएचके घरे, 20+ एकरांचे 'नमो ग्रँड सेंट्रल पार्क' आणि 4,500 हून अधिक झाडे यामुळे येथे 'ग्रीन लिव्हिंग'चा अनोखा अनुभव मिळतो. प्रकल्पामध्ये 400 हून अधिक अत्याधुनिक सुविधा, क्लब हाऊस, क्रीडा संकुल, हाय-स्ट्रीट रिटेल यांचा समावेश आहे. सहा एकरांहून अधिक खुली जागा, फुटबॉल ग्राऊंड तसेच भविष्यात आयसीएसई बोर्डाची शाळा यामुळे हा प्रकल्प परिपूर्ण जीवनशैली देणारा ठरतो.

भिवंडी-नाशिक मार्ग, घोडबंदर रोड यांसारख्या प्रमुख मार्गांशी जवळीक, तसेच प्रस्तावित मुंबई व भिवंडी-कल्याण मेट्रो लाईन्समुळे या परिसराची कनेक्टिव्हिटी अधिक मजबूत होत आहे. प्रकल्पासून जवळ असलेल्या कोलशेत खाडीकिनाराहून जाणारा कोस्टल रोड, कोलशेत खाडीवरील पूल यामुळे प्रवासाची चांगली सोय उपलब्ध होणार आहे. आगामी पायाभूत सुविधांमुळे भविष्यातील मालमत्ता मूल्यवाढीसही चालना मिळण्याची शक्यता आहे. ₹1.3 कोटींपासून सुरू होणाऱ्या किमतींसह या प्रकल्पाची विक्री वेगाने सुरू आहे.

विशेष म्हणजे, 10:90 योजनेचा लाभ 31 मार्चपर्यंत उपलब्ध असून, दर्जेदार जीवनशैली आणि दीर्घकालीन गुंतवणुकीचा विचार करणाऱ्यांसाठी ही संधी गमावू नये, असे तज्ज्ञांचे मत आहे.

# सम्राट अशोकाने प्रेमाने जग जिंकले – प्रशांत चव्हाण

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**




सम्राट अशोकाने तलवारीऐवजी प्रेम, न्याय आणि विश्वासाच्या बळावर जग जिंकले, असे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय शिक्षक प्रशांत चव्हाण यांनी केले. ते राहुल विद्यार्थी वसतीगृह, श्रीगोंदा येथे आयोजित जयंती कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुकाध्यक्ष शांताराम उबाळे होते.

प्रशांत चव्हाण पुढे म्हणाले की, जगाच्या इतिहासात अनेक राजे-महाराजे होऊन गेले; मात्र त्यांपैकी मोजक्याच राजांना जनतेच्या हृदयात कायमचे स्थान मिळाले आणि इतिहासाने गौरविले. सम्राट अशोक हा त्यापैकी एक महान सम्राट होता. त्यांनी युद्धाऐवजी प्रेमाच्या मार्गाने प्रजेला जिंकले आणि प्रजेवर मुलांप्रमाणे प्रेम करत पित्याप्रमाणे काळजी घेतली. त्यांनी आशिया खंडात भगवान बुद्धांच्या धम्माचा प्रसार केला आणि भारताबाहेरील जनतेच्या मनातही आदराचे स्थान निर्माण केले. त्यांच्या कारकिर्दीत भारताने नव्हे तर संपूर्ण जगाने सुवर्णपर्व अनुभवले, असेही त्यांनी नमूद केले. सम्राट अशोकांनी बौद्ध धम्माच्या तत्त्वांवर आधारित लोककल्याणकारी राज्यव्यवस्था उभारली. त्यांनी जनतेसाठी शेतीसाठी जमिनीचे वाटप केले, रस्ते बांधले, तलाव व विहिरी निर्माण केल्या तसेच नद्यांवर बंधारे घालून भूमी सुजलाम-सुफलाम केली. याशिवाय, आरोग्यसेवेसाठी ठिकठिकाणी आरोग्यशाळा आणि शिक्षणासाठी पाठशाळा उभारण्यात आल्या, असेही चव्हाण यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना पेढ्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा सरचिटणीस सतीश ओहोळ, सामाजिक कार्यकर्ते विनायक ससाणे, बौद्धाचार्य भारत आल्हाट, मच्छिंद्र पाटोळे, लालन शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आबासाहेब राजपूत यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रेम जाधव यांनी केले.

# श्रीगोंद्यात विकासकामांना प्रशासकीय मान्यता; निधी मंजूर

*प्रभाग २ व ३ मधील रस्ते कॉँक्रिटीकरणाला गती; नागरिकांत समाधान*




**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा शहराच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या विविध कामांना प्रशासकीय मान्यता व निधी मिळाल्याने नागरिकांत समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. लोकनेते माजी मंत्री बबनराव पाचपुते यांच्या मार्गदर्शनाखाली व आमदार विक्रम पाचपुते यांच्या विशेष प्रयत्नांतून ही कामे मार्गी लागली आहेत.

नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक २ मधील शिक्षक कॉलनी परिसरातील रस्त्याच्या सिमेंट कॉँक्रिटीकरणासाठी नागरी दलित वस्ती सुधार योजना (2025-26) अंतर्गत ३५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच प्रभाग क्रमांक ३ मध्ये मांडवगण रोड ते राहुल कोठारी यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याच्या कॉँक्रिटीकरणासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महा अभियान (2025-26) अंतर्गत निधी उपलब्ध झाला आहे. या कामांसाठी नगराध्यक्ष सुनीता खेतमाळीस, उपनगराध्यक्ष अलका अनुभुले तसेच भाजपच्या सर्व नगरसेवकांनी पाठपुरावा केला होता. विकासकामांना मंजुरी मिळाल्याबद्दल प्रभाग २ च्या नगरसेविका चांदणताई खेतमाळीस व प्रभाग ३ चे नगरसेवक एम. डी. शिंदे यांनी आमदार विक्रम पाचपुते यांसह सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. शहराच्या विकासाची गती अशीच कायम राहावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# वडाळा महादेव येथे श्री त्र्यंबकेश्वर महादेव यात्रा उत्सवाचा उत्साह

**वडाळा महादेव : (समर्थ गांवकरी)**

श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर महादेव मंदिरात सालाबादप्रमाणे यावर्षीही यात्रा उत्सवाचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले आहे. नवसाला पावणारा आणि भक्तांच्या हाकेला धावणारा 'जागृत भोळा महादेव' म्हणून या देवस्थानची पंचक्रोशीत मोठी ख्याती असून, यानिमित्त विविध धार्मिक व मनोरंजनाचे कार्यक्रम पार पडणार आहेत. यात्रा उत्सवाचा प्रारंभ दिनांक ३१ रोजी सकाळी ६ वाजता होणार आहे. गंगाजल घेऊन येणाऱ्या पायी दिंडीतील भाविकांचे ग्रामस्थांच्या वतीने भव्य स्वागत करण्यात येईल.

# विद्यार्थ्यांना 'एक्झाम पॅड' वाटप; जनानंद फाऊंडेशनचा स्तुत्य उपक्रम

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**



सामाजिक बांधिलकी जपत जनानंद फाऊंडेशनतर्फे आढळगाव परिसरातील इयत्ता पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांना मोफत 'एक्झाम पॅड'चे वाटप करण्यात आले. महेंद्र रंजना उत्तम शिंदे यांच्या पुढाकारातून, कै. चिंतामणी सुरेश शिंदे यांच्या स्मरणार्थ तसेच सौ. रंजना उत्तम शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयासह परिसरातील विविध जिल्हा परिषद शाळांमध्ये हा उपक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमास माजी मंत्री बबनराव पाचपुते यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांना आगामी परीक्षांसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी महेंद्र शिंदे यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी महत्त्वाची घोषणा केली. ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी प्रत्येक इयत्तेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष बक्षीस देऊन गौरव करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या उपक्रमांतर्गत शिवाजीनगर पठाडे वस्ती, डोकेवाडी-शिंदेवाडी, काळाणे वस्ती तसेच काळे-वाकडे वस्ती येथील शाळांमध्ये 'एक्झाम पॅड'चे वाटप करण्यात आले. पुढील टप्प्यात आढळगाव व गव्हाणेवाडी येथील शाळांमध्येही वाटप करण्यात येणार आहे. कार्यक्रमास प्रतिभाताई पाचपुते, प्रताप भैय्या पाचपुते, उत्तम आबा राऊत, शरद जमदाडे, शहाजी बापू वाकडे, पोपट जमदाडे (सर), नानाभाऊ बोळगे, देवराव पाटील शिंदे, बाळासाहेब गव्हाणे, गणेश काळे, मनोज डोके, अतुल कोकणे, विष्णु शिंदे, सागर वाकडे, नवनाथ सूर्यवंशी, नितीन जमदाडे, राहुल राऊत, किरण शिंदे, नितीन डोके, सागर नवले, सतीश काळे, सावता शिंदे, ओम जमदाडे, आदित्य शिंदे, अमोल छत्तिसे, सुरज छत्तिसे, गणेश डोके, संपत डोके, शरद नवले, देविदास डोके, शरद निकम, राजू भिमराव पठाडे, राजेंद्र वसंत पठाडे, अंकुश पठाडे, संदीप वाकडे आदींसह विविध मान्यवर, ग्रामस्थ, शिक्षक आणि शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सातत्य आणि विश्वास हाच खरा व्यवसायाचा पाया – सभापती रामजी शिंदे

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**



श्रीगोंदा तालुक्यातील ढवळगाव-देवदैठण परिसरात साई निंबराज मिल्क अँन्ड फुड्स प्रॉडक्ट्स या नव्या उद्योगाचा भव्य शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या सोहळ्याचे उद्घाटन विधान परिषदेचे सभापती रामजी शिंदे यांच्या हस्ते झाले, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार विक्रम पाचपुते होते.

उद्घाटन प्रसंगी बोलताना सभापती शिंदे यांनी उद्योजकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "व्यवसायात केवळ मोठ्या घोषणा करून उपयोग नाही; सातत्य आणि विश्वास जपणे अत्यंत महत्त्वाचे आहे. दहा वर्षांपूर्वी उद्योजक बाळासाहेब बनकर यांच्यासोबत असलेले दूध उत्पादक आजही टिकून आहेत, हीच त्यांच्या कामाची खरी पावती आहे." त्यांच्या या वक्तव्याने उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

या नव्या उपक्रमामुळे ढवळगाव व परिसरातील नागरिकांना दर्जेदार दुग्धजन्य व खाद्य उत्पादने स्थानिक स्तरावर उपलब्ध होणार असून, स्थानिक तरुणांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत. गुणवत्तेला प्राधान्य, स्वच्छता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ग्राहकांचा विश्वास संपादन करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य पणन महामंडळाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे, भाजप सरचिटणीस अशोक ईश्वरे, सचिन कातोरे, भुषण बडवे, जिल्हा सरचिटणीस शुभांगी सप्रे, उद्योजक सचिन चौधरी, माजी सभापती शहाजी हिरवे, सुरेश लोखंडे, शंकर पाडळे, सुभाष वाघमारे, शांताराम वाबळे, रवी मांडगे, राजेंद्र मोटे, अजित काकडे, अनिल बनकर, कुकडीचे संचालक अशोक वाखारे, रामदास बनकर, उद्योजक संतोष बनकर, अशोक बनकर तसेच साई निंबराज उद्योग समूहाचे अध्यक्ष आदित्य बनकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, व्यापारी, शेतकरी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण सोहळा उत्साह, जल्लोष आणि सकारात्मक उर्जेने भरलेला होता. या उपक्रमामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल आणि भविष्यात हा व्यवसाय यशाची नवी उंची गाठेल, असा विश्वास उद्योजक बाळासाहेब बनकर यांनी व्यक्त केला.

> "तुमच्या तालुक्याला लाभलेले नेतृत्व म्हणजे आमदार विक्रम पाचपुते – तरुण, तडफदार आणि अभ्यासू. पहिल्याच टर्ममध्ये त्यांनी विधानसभेत अनेक वर्षांचा अनुभव असल्याप्रमाणे कामगिरी केली आहे. बनावट पनीरचा मुद्दा असो किंवा जनतेच्या विविध प्रश्नांचा पाठपुरावा – त्यांनी ठाम, आक्रमक आणि प्रभावीपणे आवाज उठवला आहे," अशा शब्दांत सभापती रामजी शिंदे यांनी आमदार पाचपुते यांच्या कार्याचे कौतुक केले.

# ५ लाखांवरून २ लाखांवर डील

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

आंबेगाव जुन्नर उपविभागात भ्रष्टाचाराचा मोठा भंडाफोड झाला असून उपविभागीय अधिकारी गोविंद पंढरीनाथ शिंदे (वय ४६) यांना २ लाख रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. या कारवाईमुळे महसुली वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. तक्रारदार हे बांधकाम व्यावसायिक असून त्यांच्या इमारतीच्या पूर्णत्व प्रमाणपत्रासाठी त्यांनी उपविभागीय कार्यालयाशी संपर्क साधला होता. संबंधित काम मंजूर करून देण्यासाठी आरोपी अधिकाऱ्याने सुरुवातीला तब्बल ५ लाख रुपयांची लाच मागितली होती. मात्र एसीबीच्या पडताळणीनंतर ही रक्कम २ लाखांवर निश्चित करण्यात आली. तक्रारदाराने २४ मार्च २०२६ रोजी एसीबी, पुणे येथे तक्रार दाखल केली.

# शेतकरी सभासदांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेचा लाभ घ्यावा — चेअरमन राजेंद्र दादा नागवडे

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**



शेतकरी सभासदांनी आपल्या दीर्घ मुदत, मध्यम मुदत तसेच पशुपालन कर्जाची परतफेड ३१ मार्चपूर्वी करून शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र दादा नागवडे यांनी केले आहे.

प्रसिद्धीपत्रकात त्यांनी नमूद केले आहे की, महाराष्ट्र शासनाने कर्जदार शेतकरी सभासदांसाठी ही योजना जाहीर केली असून, याअंतर्गत थकीत कर्जदारांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी मिळणार आहे. तर नियमित कर्जफेड करणाऱ्या सभासदांना ५० हजार रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. मात्र, या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी ३१ मार्चपूर्वी आपल्या दीर्घ मुदत, मध्यम मुदत तसेच पशुपालन कर्जाची पूर्ण परतफेड करणे आवश्यक आहे. तसेच नियमित कर्जदारांनीही ५० हजार रुपयांच्या लाभासाठी निर्धारित मुदतीत कर्जाची बाकी भरावी, अन्यथा त्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. कर्ज थकीत राहिल्यास सध्या असलेल्या १३ टक्के व्याजदराऐवजी १५ टक्के व्याजदर लागू होणार असल्याने आर्थिक भार वाढण्याची शक्यता आहे. वेळेत कर्जफेड केल्यास जिल्हा सहकारी बँकेकडून पुन्हा कर्ज मिळणेही सुलभ होईल, असेही नागवडे यांनी स्पष्ट केले. त्यामुळे सर्व कर्जदार शेतकरी सभासदांनी आपल्या कर्जाची वेळेत परतफेड करून शासनाच्या कर्जमाफी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन राजेंद्र दादा नागवडे यांनी केले आहे.

# लोह्यात पेट्रोल-डिझेलसाठी पंपांवर गर्दी

**लोहा : (समर्थ गांवकरी)**

- **तुटवड्याच्या अफवेने नागरिकांमध्ये धावपळ; वाहनांच्या लांबच लांब रांगा**

लोहा तालुक्यात पेट्रोल व डिझेलचा तुटवडा निर्माण होणार असल्याची अफवा पसरताच शहरासह परिसरातील पेट्रोल पंपांवर नागरिकांनी मोठी गर्दी केली. अचानक वाढलेल्या या गर्दीमुळे दुचाकींसह चारचाकी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून अनेक ठिकाणी वाहतूक कोंडीची परिस्थिती निर्माण झाली आहे. अफवेमुळे घाबरलेल्या नागरिकांनी आवश्यकतेपेक्षा अधिक इंधन भरण्याचा प्रयत्न केल्याने पंपांवर ताण वाढला. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पंप चालकांना पोलिसांची मदत घ्यावी लागली. काही ठिकाणी पोलिसांच्या उपस्थितीत इंधन वितरण सुरळीत सुरू ठेवण्यात आले.दरम्यान, पेट्रोल-डिझेलप्रमाणेच घरगुती गॅससाठीही रांगा लागण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे नागरिकांना कोरोना काळातील निर्बंध व नोटबंदीच्या काळातील परिस्थितीची आठवण झाली. अचानक निर्माण झालेल्या या परिस्थितीमुळे सर्वसामान्यांमध्ये संभ्रम आणि चिंता निर्माण झाली आहे. याबाबत प्रशासनाने नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे. इंधनाचा कोणताही तुटवडा नसून पुरवठा सुरळीत सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. तसेच अनावश्यक साठेबाजी टाळून आवश्यकतेनुसारच इंधन घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.एकूणच, अफवेमुळे निर्माण झालेल्या या गोंधळामुळे लोहा शहरातील दैनंदिन जीवनावर काही काळ परिणाम झाला आहे.

# निमगाव केतकीची श्री केतकेश्वर महाराज यात्रा म्हणजे सर्व गावकऱ्यांसाठी श्रद्धा परंपरा व एकोप्याचा आनंद उत्सवच



**इंदापूर : (समर्थ गांवकरी)**

श्री केतकेश्वर महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन असलेल्या निमगाव केतकी मधील श्री केतकेश्वर महाराज यात्रा म्हणजे निमगाव केतकी सह पंचक्रोशीतील भाविक भक्तांना आनंदाची पर्वणीचा उत्सव असतो. सर्व धर्म समभाव जपत सर्वांना बरोबर घेऊन यावर्षी दिनांक 29/30/31 मार्च रोजी यात्रा तीन दिवसांमध्ये संपन्न होत आहे.

महाशिवरात्रीलाच यात्रेची मीटिंग संपन्न होऊन यात्रा कमिटी व वर्गणीदार यात्रेच्या तयारीला सुरुवात करत असतात. या यात्रेचे मुख्य वैशिष्ट्य तीन मजली सागवानी रथ भव्य मिरवणूक , शोभेचे दारू काम , आतिशबाजी , तमाशा ऑर्केस्ट्रा मनोरंजनाची कार्यक्रम , मोठे आकाशी पाळणे व महाराष्ट्रातील नामवंत मुलांच्या निकाली कुस्त्याचे मैदान हे या यात्रेचे मुख्य वैशिष्ट्य असते.

पहिला दिवस: २९ मार्च .. यात्रेची सुरुवात चैत्र शुद्ध एकादशीला होते. या दिवशी शंभर वर्ष हुन अधिक काळाचा असलेला सागवानी रथामधून श्री केतकेश्वर महादेव मूर्तीची भव्य मिरवणूक ग्रामप्रदर्शना होत असते. केतकी पासून बनवलेला नाडा दोर या साह्याने सर्व भाविक भक्त ओढतात. रथाला फुलांचे हार पताका नोटांच्या माळा नारळाचे तोरण प्रसाद विद्युत रोषणाईने सजवलेले असतो. रथाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची रेलचेल असते. रथासमोर विविध कार्यक्रम , मानाच्या कावडी , बँड पथक , दारू काम होत असते. ग्राम प्रदक्षिणा झाल्यानंतर परत तीन दिवस भाविकांसाठी बाहेर असतो.

दुसरा दिवस: ३० मार्च या दिवशी श्री केतकेश्वर महादेव मंदिरामध्ये आकर्षक सजावट केलेली असते त्याचबरोबर महादेवाच्या पिंडीला दही भाताचा वापरून आकर्षक भव्य पिंड व नागाची मूर्ती बनवण्यात येते. हे पाहण्यासाठी सर्व भाविक भक्त मंदिरामध्ये गर्दी करतात. सायंकाळी वाजत गाजत मानाच्या कावडी छबिना पार पडतो. छबीना संपन्न झाल्यानंतर शोभेचे दारूकाम इलेक्ट्रिकल फायर शो सर्वांचे आकर्षण बिंदू असते. महिलांसाठी ऑर्केस्ट्रा व पुरुषांसाठी लोकनाट्य तमाशाचे आयोजन करण्यात येते.

तिसरा दिवस ३१ मार्च तिसरा दिवस मुख्ययात्रा सकाळपासूनच भरते महिला लहान मुले तरुण यात्रेमध्ये खरेदीसाठी गर्दी करतात त्याचबरोबर मोठे आकाश पाळणे ब्रेक डान्स रेल्वे लहान मुलांसाठी पर्वणी असते. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये निकाली कुस्त्यांच्या जंगी मैदानासाठी प्रसिद्ध असलेल्या चिंचेच्या आखाड्यामध्ये महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या पैलवानांचे मल्ल युद्ध रंगते. लहान मोठ्या 300 कुस्त्या नियोजनबद्ध रीतीने पार पडतात. निमगाव केतकी आणि परिसरामध्ये बारा वाड्यावर त्या आहेत जवळपास 25 हजाराहून अधिक लोकसंख्या असलेल्या गावांमध्ये यात्रेकरिता सर्व ग्रामस्थ एक महिनाभर एकत्र येऊन यात्रेची तयारी करत असतात.

# अंधश्रद्धा वाढणे हे शासनाचे अपयश; भोंदूगिरीला राजाश्रयाचा आरोप – काँग्रेसची टीका



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

राज्यात अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीचे वाढते प्रमाण हे शासनकर्त्यांच्या अपयशाचे द्योतक असल्याची घणाघाती टीका काँग्रेसचे वरिष्ठ राज्य प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केली. पुणे येथील काँग्रेस भवनात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी ही भूमिका मांडली. तिवारी म्हणाले की, अंधश्रद्धा निर्मूलनासाठी काँग्रेस सरकारने कायदा केला असला, तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी, जनजागृती आणि प्रबोधनाचा अभाव असल्यामुळे आजही समाजातील अनेक निष्पाप लोक, विशेषतः महिलावर्ग, भोंदूगिरीचे बळी ठरत आहेत. "अंधश्रद्धा फोफावणे म्हणजे शासन व्यवस्थेचा अंकुश कमी झाल्याचे लक्षण आहे," असे ते म्हणाले. फडणवीस सरकारच्या काळात अंधश्रद्धा विरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी कमी झाल्याचा आरोप करत तिवारी यांनी सांगितले की, या कायद्याचा प्रचार-प्रसार आणि जनजागृती याकडे शासनाने दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे समाजात बुवाबाजी आणि पाखंडी प्रवृत्तींचे प्रस्थ वाढत आहे. ते पुढे म्हणाले की, जेव्हा लोकांच्या अडचणी वाढतात आणि सरकारी यंत्रणेवर विश्वास कमी होतो, तेव्हा लोक झटपट उपायांच्या शोधात अंधश्रद्धेकडे वळतात. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव आणि प्रशासनाकडून योग्य मार्गदर्शन न मिळाल्यामुळे अशा प्रवृत्ती वाढीस लागतात.

भोंदूबाबा प्रकरणांचा संदर्भ देत तिवारी यांनी प्रश्न उपस्थित केला की, अशा प्रकरणांवर शासन आणि पोलिस यंत्रणा किती प्रभावी कारवाई करते? "काही प्रकरणांत उलट माध्यमांनाच दबावाखाली आणण्याचे प्रकार घडले," असा आरोप त्यांनी केला. महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आगरकर यांनी दिलेल्या वैज्ञानिक व विवेकनिष्ठ विचारांची आठवण करून देत तिवारी म्हणाले की, भारतीय राज्यघटनेतही वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवतावाद जोपासण्याचे कर्तव्य नमूद आहे.

अंधश्रद्धा आणि जादूटोणा विरोधी कायद्याबाबत व्यापक जनजागृती करणे, नागरिकांना वैज्ञानिक विचारसरणीकडे प्रवृत्त करणे आणि भोंदूगिरीवर कठोर कारवाई करणे ही शासनाची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेला सुभाष थोरवे, भोला वांजळे, तात्या शिर्के, आबा जगताप, गणेश मोरे, राजेश सुतार, संजय अभंग, सुभाष जेधे, गणेश शिंदे, उदय लेले, नरेश आवटे आदी उपस्थित होते.

## नागरिकांनी पेट्रोल-डिझेलचा अतिरिक्त साठा टाळावा

### जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

मार्च जिल्ह्यातील नागरिकांनी पेट्रोल व डिझेलची पॅनिक खरेदी करू नये तसेच अतिरिक्त साठा करणे टाळावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्ह्यातील सर्व पेट्रोलपंपधारकांची बैठक पार पडली. या बैठकीला अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, जिल्हा पुरवठा अधिकारी डॉ. जगदीश बारदेवाड तसेच विविध पेट्रोलपंप मालक उपस्थित होते. यावेळी पेट्रोलपंपधारकांनी मांडलेल्या अडचणींचे निराकरण करण्यात आले.



जिल्ह्यासाठी आवश्यक असलेला पेट्रोल व डिझेलचा साठा पर्याप्त प्रमाणात राखण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. तसेच कोणत्याही परिस्थितीत साठाबाजी किंवा चढ्या दराने विक्री होणार नाही, याबाबत कडक सूचना देण्यात आल्या. पेट्रोलपंपधारकांच्या सूचनेनुसार रविवारी तेल डेपो सुरू ठेवणे तसेच मागणीनुसार इंधन उपलब्ध करून देण्याबाबत तेल कंपन्यांना सूचना करण्यात आल्या. पेट्रोलपंपांवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी आवश्यकतेनुसार पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्याच्या सूचना अतिरिक्त पोलीस अधीक्षक सूरज गुरव यांना देण्यात आल्या. जिल्ह्यातील उपलब्ध साठ्याचा आढावा घेतला असता, दैनंदिन गरजेनुसार पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे स्पष्ट झाले असल्याची माहिती जिल्हाधिकारी कर्डिले यांनी दिली.

## धायरी परिसरात भव्य शोभायात्रेचे आयोजन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

रामनवमीनिमित्त धायरी परिसरात भगवान श्रीरामांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या यात्रेत स्थानिक नागरिक, युवक व महिला मोठ्या उत्साहाने पारंपारिक वेशभूषा परिधान करून सहभागी झाले. या शोभायात्रेमुळे धायरीत प्रचंड उत्साहाचे, भक्तिपूर्ण आणि चैतन्यमय वातावरण निर्माण झाले. सरकार प्रतिष्ठान, अखिल नरवीर तानाजी मालुसरे पथ श्रीराम नवमी उत्सव समितीच्या वतीने ही शोभायात्रा आयोजित करण्यात आली. लक्ष्मी मंगेश कदम यांच्या नेतृत्वाखाली आशिष बेनकर, अक्षय उंदरे, गणेश साखरे, सचिन सोनवणे, संदीप स्वामी, गणेश पासलकर, गणेश खामकर, अजिंक्य जाधव यांनी ही यात्रा भव्य आणि देखण्या स्वरूपात पार पाडली. भव्य रथावर फुलांची आरास आणि दिव्यांची रोषणाई, त्यात प्रभू श्रीरामांची धनुर्धारी



प्रतिमा स्थापित करण्यात आली. या रथाच्या समोर सध्या समाजातील अत्यंत गंभीर स्वरूप धारण केलेल्या महिलांवरील अत्याचार आणि विशेषतः लव्ह जिहादच्या नावाखाली होणारी महिलांची फसवणूक याबाबत जनजागृती करणारे देखावे, आणि चित्र यांचा समावेश असलेला रथ मार्गक्रमण करत होता. म मल्हारी खंडेराय आणि बानू यांच्या विवाहाचा देखावा आणि पारंपारिक कर्नाटकी देखावाही एका रथावर साकारण्यात आला. शंखवादन पथक, परशुराम वाद्य पथक, ढोल लेझीम पथक, बँड पथके, वारकरी भजनी मंडळ यांनीही शोभायात्रेत सहभागी होऊन त्यात रंग भरले. शोभायात्रा पाहण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने रस्त्याच्या बाजूला गर्दी केली. गणेश नगरी ते धायरी फाटा या मार्गावर काढण्यात आलेल्या या शोभायात्रेमुळे परिसरातील वातावरण पावित्र्यमय बनले. शोभा यात्रेचे हे दुसरे वर्ष असून अल्पावधीतच या उपक्रमाला धायरीकरांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे.

## क्रॉम्प्टनचा 'अमिओ फ्रेश' कोल्ड प्रेस ज्यूसर लाँच

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

धावपळीच्या जीवनशैलीत संतुलित पोषण राखणे कठीण होत असताना क्रॉम्प्टन ग्रीव्हज कंझ्युमर इलेक्ट्रिकल्स लिमिटेडने 'हेल्दी चॉईसेस मेड ईजीयर' या उपक्रमांतर्गत 'अमिओ फ्रेश' कोल्ड प्रेस ज्यूसर बाजारात आणला आहे. हा ज्यूसर कोल्ड प्रेस तंत्रज्ञानावर आधारित असून फळे, भाज्या आणि नट्समधील आवश्यक पोषक घटक, जीवनसत्त्वे आणि अँटी-ऑक्सिडंट्स टिकवून ठेवण्यास मदत करतो. पारंपरिक ज्यूसिंग पद्धतींमध्ये उष्णता आणि उच्च गतीमुळे पोषणाचा ऱ्हास होत असताना, अमिओ फ्रेश सुमारे 90 टक्क्यांपर्यंत पोषक तत्वे जतन करतो, असे कंपनीने सांगितले.

## श्रीराम दरबारमध्ये श्रीराम नवमी उत्साहात साजरी

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

जय श्रीराम चा जयघोष, श्रीराम जय राम जय जय राम मंत्राचा अखंड मंत्रोच्चार, विविध रामभक्तीपर गीतांचा जागर आणि हजारो राम भक्तांची उपस्थिती अशा भक्तिमय वातावरणात कोंढवा खुर्द येथील श्री संकट हरण महादेव मंदिराच्या आवारातील श्रीराम दरबार मध्ये श्रीराम नवमी अतिशय उत्साहात साजरी करण्यात आली.

पवन बंसल आणि सुनीता बंसल यांनी आपला नातू मास्टर सरस बंसल याच्या स्मृतीनिमित्त कोंढवा खुर्द मधील श्री संकट हरण महादेव मंदिरामध्ये 2021 रोजी श्रीराम दरबार या मंदिराची स्थापना केली.या मंदिरामध्ये श्रीराम सेवा समितीच्या माध्यमातून यंदा सहाव्या वर्षी श्रीराम नवमी उत्सव थाटामाटात साजरा करण्यात आला. पवन बंसल, सुनीता बंसल, ईश्वरचंद गोयल, जयभगवान गोयल, पवन चमेडिया, गुंजन तवाल



,नरेंद्र गोयल ,प्रेमचंद मित्तल ,सतीश अग्रवाल ,योगेश जैन, गोयल गंगा ग्रुपच्या गीता गोयल, विक्रम बंसल रुची नरेंद्र गोयल, माजी नगरसेवक तानाजी लोणकर यांच्यासह हजारो राम भक्त या महोत्सवामध्ये सहभागी झाले होते. दुपारी बारा वाजता श्रीराम जन्म उत्सवाचा सोहळा थाटामाटात पार पडला.श्रीराम नवमी उत्सवानिमित्त संपूर्ण मंदिर परिसर विविधरंगी फुलांनी सजविण्यात आलेले होते. विविध रंगी सजावट आणि आकर्षक रोषणाई यामुळे मंदिर परिसर उजळून निघाला होता. मंदिरामध्ये आयोजित करण्यात आलेले भजन, आरती आणि धार्मिक कार्यक्रमामुळे मंदिर परिसरामध्ये अतिशय भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.हजारो भाविकांना महाप्रसाद देण्यात आला. महोत्सवा संदर्भात पवन बंसल म्हणाले , दरवर्षी रामनवमी या मंदिरामध्ये अतिशय उत्साहात साजरी करण्यात येते.याच्या माध्यमातून श्रीरामांचा आशीर्वाद सर्व जनतेला मिळत आहे याचा आम्हाला आनंद आहे. सुनिता बंसल म्हणाल्या, आमचा नातू सरस बंसल याच्या स्मृतीनिमित्त उभारण्यात आलेल्या या मंदिराच्या माध्यमातून आम्हाला श्रीराम भक्तांची सेवा करण्याची दरवर्षी संधी मिळत आहे ही आमच्यासाठी अतिशय भाग्याची गोष्ट आहे. तानाजी लोणकर म्हणाले 1868 रोजी श्री संकट हरण महादेव मंदिर स्थापन करण्यात आले त्यानंतर या मंदिरामध्ये विविध देवतांची मंदिरे निर्माण करण्यात आली पवन कुमार बंसल यांच्या माध्यमातून 1921 रोजी श्रीराम दरबार हे प्रभू रामाचे मंदिर स्थापन करण्यात आले यामध्ये दरवर्षी श्रीराम नवमी उत्सव उत्साह साजरा करण्यात येतो आणि सुमारे 50 हजार भाविक यामध्ये सहभागी होतात. गीता गोयल म्हणाल्या, आम्हाला श्रीराम दरबार या मंदिराच्या मुळे श्रीराम नवमीच नव्हे तर इतर वेळी ही श्रीराम भक्तांची सेवा करण्याची संधी मिळत आहे.

## विद्यार्थ्यांवर 'जगाचे गुरुस्थान' मिळवून देण्याची जबाबदारी – पांडुरंग बलकवडे



**पुणे : (समर्थ गांवकरी)**

एकेकाळी सुवर्ण भारत म्हणून ओळखला जाणारा देश पुन्हा नव्याने घडवून त्याला जगाचे गुरुस्थान प्राप्त करून देण्याची जबाबदारी आजच्या विद्यार्थी वर्गावर आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे यांनी केले. विद्यार्थ्यांनी कोणत्याही क्षेत्रात करिअर घडवताना राष्ट्रनिष्ठा आणि कामावरील निष्ठा अबाधित ठेवावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

रमणबाग प्रशालेत जागतिक रंगभुमी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बलकवडे आणि उद्योजक डॉ. दिलीप देशपांडे यांच्या हस्ते सदानंद अचवल यांच्या स्मरणार्थ नाट्य क्षेत्रातील उल्लेखनीय विद्यार्थ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. हे पुरस्कार अमेरिकास्थित अनिल प्रयाग यांनी प्रायोजित केलेले आहेत. यावेळी 'नाट्य आराधना' पुरस्काराने इयत्ता सहावीतील अमोघ किरण कुलकर्णी, तर 'नाट्य प्रेरणा' पुरस्काराने इयत्ता दहावीतील गौरव विशाल जगताप यांचा सन्मान करण्यात आला. तसेच राज्य नाट्य स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवलेल्या 'माय सुपर हिरो' या नाटकातील विद्यार्थ्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात बोलताना बलकवडे यांनी कला ही व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यावश्यक असल्याचे सांगितले. "कला माणसाचे जीवन समृद्ध करते आणि ती प्रभावी संवादाचे साधन आहे. भारताला ६४ कलांची परंपरा लाभली असून नव्या पिढीने ती अधिक समृद्ध करावी," असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. दिलीप देशपांडे यांनी नाटकाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, "नाटक हा समाजाचा आरसा आहे. समाजातील चांगल्या-वाईट गोष्टींचे प्रभावी चित्रण नाटकातून करता येते. ही जिवंत कला असल्याने कलाकारांकडे समयसूचकता आणि एकाग्रता अत्यावश्यक असते." कार्यक्रमाची सुरुवात तनय नाझीरकर यांनी सादर केलेल्या नांदीने झाली. उपमुख्याध्यापक महेश जोशी यांनी प्रास्ताविक व आभार प्रदर्शन केले. अचवल यांचे वर्गमित्र दिलीप परदेशी यांनी अचवल यांच्या आठवणींना उजाळा दिला, तर दीप्ती डोळे यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमाला शाळा समितीचे अध्यक्ष डॉ. शरद आगरखेडकर, पर्यवेक्षिका अंजली गोरे, मंजुषा शेलूकर, नाट्यछंद विभागाचे प्रमुख रवींद्र सातपुते यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी आणि १९६३ च्या मॅट्रिक बॅचमधील अचवल यांचे अनेक वर्गमित्र उपस्थित होते.

## मोरया रुग्णालयात यशस्वी कॉक्लियर इंप्लांट

**पिंपरी : (समर्थ गांवकरी)**

जन्मतः कर्णबधिर असलेल्या दोन चिमुकल्या मुलींना ऐकण्याची आणि बोलण्याची नवी संधी देत चिंचवड येथील मोरया रुग्णालयाने वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवले आहे. रुग्णालयातील कान-नाक-घसा शल्य चिकित्सक डॉ. अक्षय वाचासुंदर यांनी इंदू आणि गीत या दोन्ही मुलींवर यशस्वी कॉक्लियर इंप्लान्ट शस्त्रक्रिया करून त्यांना नवजीवन दिले. यासंदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. अक्षय वाचासुंदर यांनी माहिती देताना सांगितले की, देहूरस्ता येथील मल्लेश कानडे यांच्या दोन्ही मुली जन्मतः ऐकू येत नसल्याने कुटुंबावर मोठा मानसिक आघात झाला होता. मोठी मुलगी इंदू आणि नंतर जन्मलेली गीत या दोघीही कर्णबधिर असल्याचे निदान झाल्यानंतर त्यांच्या उपचारांचा प्रश्न गंभीर बनला होता.

## आरटीई कायद्यात सुधारणा करण्याची मागणी

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

राईट टू एज्युकेशन ॲक्ट, 2009 मध्ये आवश्यक सुधारणा करून शिक्षण व्यवस्था अधिक समावेशक, न्याय्य आणि प्रभावी करण्यासाठी नागरिक सोशल फाउंडेशनतर्फे विविध मागण्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने अनुदान, अंतर बदल, अल्पसंख्याक संस्थांना दिलेली सूट यांचा समावेश असल्याची माहिती नागरिक सोशल फाउंडेशनचे सीए सर्वेश मेहेंदळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी संस्थेचे संचालक प्रीतम थोरवे, अमेय सप्रे उपस्थित होते. पुढे बोलतान सीए सर्वेश मेहेंदळे म्हणाले, भारतीय संविधानातील कलम 21A नुसार ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला मोफत व सक्तीचे शिक्षण देणे ही राज्याची जबाबदारी असल्याचे अधोरेखित करत, शिक्षण हा मूलभूत हक्क सर्वांना समानतेने मिळावा, अशी भूमिका





संस्थेची आहे. शिक्षण हा मूलभूत हक्क असल्यामुळे आरटीई कायदा कोणत्याही अपवादाशिवाय सर्व शैक्षणिक संस्थांवर, अल्पसंख्याक संस्थांसह, समानपणे लागू करावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. धार्मिक शिक्षण देणाऱ्या शाळांना सध्या दिलेली सूट (Section 1(5)) रद्द करून संपूर्ण शिक्षण व्यवस्थेत एकसमान आणि न्याय्य धोरण लागू करण्याची गरज व्यक्त करण्यात आली. आरटीई अंतर्गत शाळांना दिले जाणारे अनुदान वेळेत न मिळाल्यास, थकीत रकमेवर व्याजासह पेमेंट करण्याची स्पष्ट कायदेशीर तरतूद करण्याची मागणी करण्यात आली. सध्याचा 1 किमी/3 किमी अंतर निकष शहरांच्या वाढत्या लोकसंख्येनुसार अपुरा ठरत असल्याने, A+, A, B, C, D ग्रेडिंग प्रणालीवर आधारित नवीन निकष तयार करून ग्रामीण व शहरी भागांसाठी स्वतंत्र नियम निश्चित करावेत, असे सुचविण्यात आले. समाजातील सर्व घटकांनी या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देण्याचे आवाहन नागरिक सोशल फाउंडेशनतर्फे करण्यात आले आहे.

## बार्टीच्या मनमानी कारभाराविरोधात NSUI चे आक्रमक आंदोलन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) कडून राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सुरू असलेल्या गंभीर अनियमितता, मनमानी कारभार आणि विद्यार्थ्यांच्या तक्रारींकडे होत असलेल्या जाणीवपूर्वक दुर्लक्षाच्या निषेधार्थ आज महाराष्ट्र प्रदेश NSUI चे प्रदेश महासचिव ॲड. कृष्णा साठे यांच्या नेतृत्वात बार्टी कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी करत आक्रमक आंदोलन करण्यात आले. यावेळी, प्रदेश सचिव आदेश सरोदे, सुश्मिता हरणे, पुणे जिल्हाध्यक्ष ॲड.अभिजित जिल्हा उपाध्यक्ष सिद्धांत जांभुळकर, जिल्हा महासचिव रविराज कांबळे, सुशांत दसाडे, प्रसाद चव्हाण, प्रशांती नेजदार, आदित्य भिसे, सुयोग




बनसोडे, ओम भवर सारंग लांडगे, यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनादरम्यान बार्टी प्रशासनाच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. स्पर्धा परीक्षार्थींच्या भवितव्याशी खेळ केला जात असल्याचा आरोप करत "विद्यार्थ्यांना न्याय द्या", "मनमानी कारभार बंद करा" अशा घोषणा देण्यात आल्या. बार्टीमार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण प्रक्रियेत शासन निर्णयानुसार निश्चित करण्यात आलेल्या HIERARCHY चा अवलंब केला जात नसून निवड प्रक्रियेमध्ये मनमानी पद्धतीने निर्णय घेतले जात आहेत.

## ॲमेझॉन एमएक्स प्लेयरची हाय एनर्जी फिटनेस सिरीज 'फेमसली फिट' चर्चेत

### फेमसली फिट'चे ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर आता मोफत स्ट्रिमिंग, दर शुक्रवारी नवीन एपिसोड पाहता येणार

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

ॲमेझॉन एमएक्स प्लेयर या भारतातील आघाडीची विनामूल्य, प्रीमियम, जाहिरात-समर्थित व्हिडिओ स्ट्रीमिंग सेवेने आज फिटनेस शो फेमसली फिट हा एक पूर्णपणे नवीन साप्ताहिक फिटनेस आणि जीवनशैली शो प्रदर्शित केला. सोफी चौधरी ने सूत्रसंचालन केलेल्या या सहा एपिसोडच्या सिरीजमध्ये तंदुरुस्ती, प्रसिद्धी आणि स्पष्ट संभाषण निराळीच उंची गाठणार. ज्यामुळे प्रेक्षकांना भारतातील काही सर्वात लोकप्रिय सेलिब्रिटींमागील दिनचर्या आणि कथांवर एक अनफ़िल्टर्ड दृष्टीकोन मिळतो. प्रत्येक भागामध्ये एक ए-लिस्ट सेलिब्रिटी रेड कार्पेटपासून दूर जाऊन एका





वर्कआऊट सेटअपमध्ये पाऊल ठेवतो. या सिरीजची सुरुवात आज देशातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या अभिनेत्रींपैकी एक, क्रिती सॅनन, त्यानंतर फिटनेस आयकॉन आणि सदाबहार मलायका अरोरा तसेच प्रचंड लोकप्रिय आणि कायम प्रेक्षक पसंतीस उतरलेली सोनम बाजवा यांच्याद्वारे होते. या श्रेणीमध्ये गझल अलघ (सह-संस्थापक, होनासा कन्झ्युमर लिमिटेड) यांचाही समावेश असून आणखी काही रोमांचक नावे लवकरच या श्रेणीत दाखल होणार आहेत. योग आणि सामर्थ्य प्रशिक्षणापासून ते कार्यात्मक तंदुरुस्तीपर्यंत, प्रेक्षकांना प्रामाणिक दिनचर्या, वैयक्तिक शिस्त आणि लोकांच्या नजरेत तंदुरुस्त राहण्याची वास्तविकता जवळून उपलब्ध होते. 'फेमसली फिट' ख्यातनाम व्यक्तींच्या स्पष्ट अंतर्दृष्टीचा वापर करते, सामान्य तंदुरुस्तीभोवती असलेल्या दंतकथांचे खंडन करते आणि त्यांचे अधूनमधून होणारे चॅट किंवा शॉर्टकट देखील उघड करते. ज्यामुळे सिरीज अत्यंत संबंधित आणि शेअर करण्यायोग्य बनते.

ॲमेझॉन ॲड्सचे डायरेक्टर गुलशन वर्मा पुढे म्हणाले, "'फेमसली फिट' प्रेक्षकांना तंदुरुस्तीच्या वास्तविक बाजूच्या जवळ आणण्यासाठी तयार करण्यात आली आहे. जिथे सेलिब्रिटी दिनचर्या दैनंदिन शिस्तीत पूर्ण करतात. या सिरीजची मांडणी अस्सल असल्याने प्रत्येक क्षण अनस्क्रिप्टेड ठेवून, हा शो अधिक संबंधित आणि आकर्षक पाहण्याचा अनुभव निर्माण करतो. त्याच वेळी, ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर प्रेक्षक खऱ्या अर्थाने ज्या कंटेंटशी जोडले जातात. त्यामध्ये ब्रँडला कथेचा भाग बनण्याचा एक नैसर्गिक मार्ग मिळतो."

आपला उत्साह व्यक्त करताना, सोफी चौधरी म्हणाली, "तंदुरुस्ती हा कायमच माझ्या जीवनशैलीचा अविभाज्य भाग राहिला आहे आणि 'फेमसली फिट' चे सूत्रसंचालन हा त्याचा नैसर्गिक विस्तार असल्यासारखे वाटले. मला या शो'बद्दल आवडणारी गोष्ट म्हणजे तो अतिशय वास्तविक आणि अनफिल्टर्ड आहे. यामध्ये केवळ व्यायामाबद्दलची चर्चा नाही नसून त्यामागील शिस्त आणि मानसिकता समजून घेण्याबद्दल प्रयत्न आहे. प्रत्येक सेलिब्रिटी त्यांच्या तंदुरुस्तीच्या प्रवासाला स्वतःच्या अनोख्या पद्धतीने कसे पाहतो हे पाहणे आश्चर्यकारकपणे प्रेरणादायी आहे. बरीच स्पष्टता, गोंधळ आणि मजा आहे. प्रेक्षक कधी एकदा ॲमेझॉन एमएक्स प्लेयरवर हा शो पाहतात, असे झाले आहे." तम्घा एंटरटेनमेंटचे संस्थापक आणि सीईओ दमयंत सिंग खनोरिया पुढे म्हणाले, "जगाच्या तुलनेत भारत सर्वात वेगाने फिटनेस प्रेक्षक वाढत आहेत. प्रेक्षकांना स्क्रीनवर दिसणाऱ्या गोष्टी आकांक्षादायी वाटल्या तरी आपल्याशा वाटल्या पाहिजे. तामघामध्ये आम्हाला हे अंतर जाणवले आणि ते कमीत-कमी करण्यावर आमचा भर आहे.